- 8 MAR 2017

कुमारक्रांती

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# योग्य नियोजनातूनच आयुष्यात यश मिळविणे शक्य : रंगनाथ नाईकडे

**कोल्हापूर :** आयुष्यात कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी योग्य नियोजन करणे आवश्यक आहे, असे मत उपवनसंरक्षक रंगनाथ नाईकडे यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सेवा-पूर्व मार्गदर्शन केंद्रातर्फे विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत हो-ते. अध्यक्षस्थानी केंद्राचे समन्वयक डॉ. जगन कराडे होते. यावेळी रेशीम संचालनालयाचे माजी संचालक कॅप्टन डॉ. लक्ष्मीकांत कलंत्री यांनीही मार्गदर्शन केले. श्री. नाईकडे म्हणाले, स्पर्धा परी-क्षेत यशस्वी होण्याचे लक्ष्य विद्यार्थ्यांनी बाळगावेच, पण त्याचबरोबर आपल्या करिअरचा प्लॅन बी सुद्धा तयार ठेवावा. जेणे करून स्पर्धा परीक्षेपेक्षाही आयुष्यात यशस्वी होणे शक्य होईल. आयुष्यात कोणत्याही क्षेत्रात जा, नेहमी वरच्या मजल्यावर जाण्याचे नियोजन करा. आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोन गांभीर्याचा असायला हवा.

यावेळी स्पर्धा परीक्षेची तयारी नेमकी कशी करावी, याविषयीही नाईकडे यांनी मार्गदर्शन केले. सध्या केंद्रीय लोकसेवा आणि राज्य सेवा यांचा अभ्यासक्रम सारखाच आहे, केवळ पॅटर्न बदलला आहे. अभ्यास करताना मागील दहा वर्षांतील प्रश्नपत्रिका अभ्यासाव्यात. चालू घडामोडींचा अभ्यास मात्र अद्ययावत करणे गरजेचे आहे, असेही त्यांनी सांगितले. कॅप्टन डॉ. लक्ष्मीकांत कलंत्री यांनी विद्यार्थ्यांना स्वतः ला ओळखण्याचा सल्ला दिला. जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या बळा-वरच विद्यार्थ्यांना हव्या त्या क्षेत्रात यश मिळविणे शक्य आहे. यशासाठी कोणताही शॉर्टकट नसतो, असे त्यांनी सांगितले. डॉ. जगन कराडे यांनी स्व-ागत व प्रास्ताविक केले, तसेच आभार मानले.

8 MAR 2017
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# टिळकांचे विचार नव्याने आत्मसात व्हावे

## दीपक टिळक : शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे चर्चासत्र

**कोल्हापूर :** स्वराज्यामध्ये सामाजिक, आर्थिक व राजकीय परिवर्तन घडवून आणण्यासाठी कायद्याचे नव्हे, तर व्यक्तीचे मनोबल बदलण्याची आवश्यकता लोकमान्य टिळक यांना अभिप्रेत होती. समाजाच्या बदललेल्या परिस्थितीमध्ये लोकमान्य टिळकांचे सामाजिक, आर्थिक व राजकीय विचार नव्याने आत्मसात करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दीपक टिळक यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभाग, गांधी अभ्यास केंद्रातर्फे आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर, तर ज्येष्ठ अभ्यासक किशोर बेडकिहाळ, डॉ. अवनीश पाटील प्रमुख उपस्थित होते.

'स्वराज्य संकल्पना आणि त्याचे सद्य:कालीन औचित्य' असा चर्चासत्राचा विषय होता. डॉ. टिळक म्हणाले, लोकमान्य टिळक हे केवळ राजकीय पुढारी नव्हते, तर ते अर्थतज्ज्ञही होते. त्यांनी स्वतंत्र भारताचे स्वतंत्र अर्थकारण असावे, असा आग्रह धरलेला होता. ज्या काळात सूक्ष्म अर्थशास्त्राची कल्पनासुद्धा अस्तित्वात नव्हती, त्या काळामध्ये त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेचा सूक्ष्मरीत्या अभ्यास केला होता.

किशोर बेडकिहाळ म्हणाले, गांधीविचार समजून घेणे हे एक बौद्धिक आव्हान आहे. तरुणांनी ते स्वीकारले पाहिजे.

डॉ. अवनीश पाटील म्हणाले, बाबू चित्तरंजन दास क्रांतिकारी विचारवंत होते. देशासाठी बलिदान करणे हा भारतीयांचा आदर्श आहे; परंतु तो आज आपण विसरून गेलो आहोत. त्यामुळे आज देश कमकुवत बनला आहे. दरम्यान, चर्चासत्राचा समारोप म्हैसूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. दयानंद माने यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी राज्यशास्त्राचे विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. भारती पाटील, रवींद्र भणगे, आदी उपस्थित होते. (प्रतिनिधी)

8 MAR 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उत्तम शिक्षक, उत्तम प्रशासक

मेरिट स्कॉलरशिप, संशोधनाला बळ देणारी 'कोर्ट' संकल्पना, पाणी स्वयंपूर्ततेबाबत बंधाऱ्याची उभारणी अशा विविध उपक्रमांतून समाजशास्त्रज्ञ व माजी कुलगुरु प्रा. डॉ. द. ना. धनागरे यांनी शिवाजी विद्यापीठाचा विकास साधला. त्यांच्या निधनामुळे विद्यापीठाच्या विकासाचा दुवा हरपला असून, शिक्षणक्षेत्र उत्तम संशोधक, शिक्षक आणि प्रशासकाला मुकले आहे.



शिवाजी विद्यापीठात दि. २१ जानेवारी २000 रोजी दीक्षान्त समारंभासाठी आलेल्या माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्यासमवेत डॉ. धनागरे.

शिवाजी विद्यापीठामध्ये नोव्हेंबर १९९५ मध्ये प्रा. धनागरे हे कुलगुरुपदी रुजू झाले. या पदावर ते ऑक्टोबर २००० पर्यंत होते. विद्यापीठातील शिक्षण, संशोधन वाढविण्यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबविले. सन १९९८-९९ च्या दरम्यान विद्यार्थ्यांसाठी मेरिट स्कॉलरशिप सुरू केली. ती आजही कायम आहे. शिवाजी विद्यापीठाला पाण्याबाबत स्वयंपूर्ण बनविण्यासाठीचा पाया त्यांनी घालताना परिसरात बंधाऱ्यांची उभारणी केली. स्वातंत्र्यसैनिक, शहीद यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांनी क्रांतिवन साकारले. तत्कालीन युनायटेड वेस्टर्न बँकेच्या माध्यमातून त्यांनी 'गोडबोले अध्यासना'ची सुरुवात केली.

समाजशास्त्राचे अभ्यासक असणारे प्रा. धनागरे हे समाजाशी नाळ, बांधीलकी असणारे समाजशास्त्रज्ञही होते. शेतकरी चळवळीवर त्यांचा मोठा अभ्यास होता. प्रशासनातील कायदेकानू यांचे त्यांना ज्ञान होते. प्रशासनात दीर्घकाळ रोजंदारीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांनी न्याय मिळवून दिला. विद्यापीठातून सेवामुक्त झाल्यानंतर ते सिमला येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ हायर स्टडीज्‌मध्ये संशोधन करीत होते. आयुष्यात अखेरपर्यंत ते संशोधनात मग्न होते.

- डॉ. बी. एम. हिर्डेकर, माजी परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ

## गोविंद पानसरेंशी जवळचे संबंध

कॉ. गोविंद पानसरे यांच्याशी धनागरे यांचे अतिशय जवळचे संबंध होते. त्यांच्याच सांगण्यावरुन त्यांनी 'उच्च शिक्षण : ध्येयवादाकडून बाजारपेठेकडे' हे पुस्तक मुंबईच्या लोकवाङ्मय प्रकाशनाकडे प्रसिद्धीसाठी दिले होते.

## 'गरवारे' मध्ये ग्रंथदालन

धनागरे यांच्याकडे प्रचंड ग्रंथसंग्रह होता. त्यांतील काही ग्रंथ त्यांनी महाविद्यालयांना देण्यास सुरुवात केली होती. सांगली येथील गरवारे कन्या महाविद्यालयाला त्यांना मोठ्या प्रमाणावर ग्रंथसंपदा दिली होती. त्यामुळे धनागरे यांच्या नावे त्यांनी स्वतंत्र विभागच महाविद्यालयामध्ये सुरु केला आहे.

- 8 MAR 2017
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सत्य, अहिंसा ही संस्कृतीची मूलतत्त्वे

## कुलगुरू रमेशकुमार पान्डेय : महावीर महाविद्यालयामध्ये व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**



**कोल्हापूर : महावीर कॉलेजमध्ये झालेल्या व्याख्यानमालेत बोलताना प्रा. रमेशकुमार पान्डेय.**

कोल्हापूर, ता. ७ : ''शुद्ध आचरण, चारित्र्य, ज्ञानाची पवित्रता, सत्य, अहिंसा, श्रद्धा, आत्मशुद्धी, ज्ञान, शांती, क्षमा, समता ही भारतीय श्रमण संस्कृतीची मूलतत्त्वे आहेत. या तत्त्वांद्वारे योगदान लाभलेली भारतीय संस्कृती हीच भारतीयत्वाची खरी ओळख आहे,'' असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील श्री लालबहादूर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रमेशकुमार पान्डेय यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ, महावीर महाविद्यालयातर्फे श्री आचार्यरत्न देशभुषण मुनीराज स्मृती व्याख्यानमालेत 'भारतीय संस्कृती के समुन्नयन में श्रमण संस्कृती का योगदान' यावर त्यांनी मार्गदर्शन केले. संस्थाध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे अध्यक्षस्थानी होते.

प्रा. पान्डेय म्हणाले, ''खंडन-मंडन करून आक्षेपरहित झालेल्या संस्कृतीला श्रमण संस्कृती म्हणतात. ज्ञान हे आचाराचे सार असून आचारशुद्ध मनुष्याला समाजात स्थान असते. ज्ञान हे पवित्र आहे. अशा ज्ञानामुळे मनुष्य निर्भय बनतो. शरणागत, जिज्ञासा, सेवा हे ज्ञान मिळविण्याचे मार्ग आहेत. ज्ञानसंपन्न गुरू-शिष्याच्या उन्नतीसाठी सतत कार्यरत असतो.''

या व्याख्यानमालेसाठी संस्कृत विद्यापीठातील प्राकृतचे विभागप्रमुख डॉ. जयकुमार उपाध्ये यांनी एक लाखांचा धनादेश डॉ. नांदवडेकर यांच्याकडे सुपूर्द केला. श्री. आवाडे यांनीही एक लाख देण्याची घोषणा केली. संस्थेचे अध्यक्ष ॲड. के. ए. कापसे, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. जयकुमार उपाध्ये, महावीर देसाई, ॲड. पी. आर. पाटील उपस्थित होते. प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे यांनी आभार मानले. डॉ. प्रकाश कांबळे यांनी सूत्रसंचालन केले.

महाराष्ट्र टाईम्स
8 MAR 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आज डॉ. कांकरियांचे व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बेटी बचाओ अभियानांतर्गत समाजशास्त्र विभागामार्फत बुधवारी (ता. ८) डॉ. सुधा कांकरिया यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले आहे. राजर्षी शाहू सभागृहात सकाळी अकरा वाजता 'लेक वाचवा अभियान' विषयावर त्यांचे व्याख्यान होणार आहेत. व्याख्यानास उपस्थित राहण्याचे आवाहन समाजशास्त्र विभागाने केले आहे.



- 8 MAR 2017 महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बदलते जग आणि महिला

आठ मार्च जागतिक महिला दिन जगात सर्वत्र साजरा होतो. संयुक्त राष्ट्रसंघाच्या यूएन वुमेन या संकेतस्थळावर यावर्षीच्या महिला दिनाच्या मध्यवर्ती संकल्पनेची माहिती दिलेली आहे. 'वुमेन इन द चेंजिंग वर्ल्ड ऑफ वर्क : प्लॅनेट ५०-५० बाय २०३०' या व्यापक संकल्पनेवर आजचा दिवस साजरा होत आहे. जगातील निम्मी लोकसंख्या महिलांची असल्याने हे जग केवळ पुरुषांचे नाही तर निम्मे आमचेही आहे, अशा आशयाचे प्लॅनेट ५०-५० हे सूत्र विचारात घेणे आवश्यक आहे. स्त्री-पुरुष समानता ही दोघांच्याही विकासाला सहजीवनाला अत्यंत आवश्यक आहे, यात दुमत असण्याचे कारण नाही. पण महिलांचे स्थान, त्यांचे अस्तित्व, त्यांना महत्त्व देण्याची मानसिकता आजही नाही हे आपल्या आजूबाजूच्या रोजच्या उदाहरणावरून, निरीक्षणावरून आपण सहजपणे सांगू शकतो. उच्चशिक्षणात नॅकच्या नामांकनाला सामोरे जातांना जेंडर ऑडिट हा अहवाल महाविद्यालये, विद्यापीठे यांना देणे अनिवार्य असताना, जेंडर ऑडिट कशासाठी करायचे, या विषयी जाणून घेणे आवश्यक आहे. आपण आपल्या परिसरातील महिलांना आवश्यक सुविधा देतो, का ? हा विचार या निमित्ताने करणे म्हणजे महिलांच्या प्रश्नांची जाणीवजागृती आवश्यक आहे. महिलांसाठी केवळ विविध सुविधांचे फलक लावणे, एवढाच महिला सर्वसमावेशक धोरणांचा मर्यादित अर्थ नाही. केवळ महिला आहे म्हणून तिला हक्क आणि अधिकार यापासून वंचित करणे, अधिकारपदापासून शक्यतो लांब ठेवणे म्हणजे महिला सुरक्षितता नाही तर सर्व धोरणांमध्ये महिलांचा समावेश होणे आवश्यक आहे. महिलांना सुरक्षित वातावरण देणेही आवश्यक आहे.

'महिला विश्व' याकडे गेली अनेक दशके आंतरराष्ट्रीय स्तरावर विषेशतः संयुक्त राष्ट्रसंघाचा स्वतंत्र विंभाग कार्यरत आहे. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धा युद्धावर जाणाऱ्या सैनिकांना, निर्भयपणे तुम्ही पुढे जा, आम्ही खंबीरपणे घर सांभाळू, अशा आशयाच्या महिलाकेंद्रित जाहिराती करण्यात आल्या. पुरुषांच्या अनुपस्थितीत मुले, वृद्ध यांना सांभाळणाऱ्या महिला, युद्धात पती



गमावलेल्या आणि घर चालविण्यासाठी सेक्रेटरी, टेलिफोन ऑपरेटर, रिसेप्सनिस्ट, नर्स अशा लहान-मोठ्या नोकऱ्या करत घरांचे अर्थार्जन करणाऱ्या महिलांचे जग कमालीचे बदलले. युद्धकाळातील गरज ही महिलांच्या अर्थार्जनाची आवश्यकता निर्माण झाली. 'वर्क फॉर ऑल' या तत्त्वानुसार आज सर्वच क्षेत्रे महिलांसाठी खुली करण्यात आली आहेत. असे असले तरी कामांचे तास, दुहेरी जबाबदारी, मातृत्व, संगोपन, वृद्धांची देखभाल, घराची जबाबदारी यामुळे जगातील महिला या असंघटित क्षेत्रात कमी वेतनावर काम करताना दिसतात. जगातील ६३ टक्के महिला घरातील व्यवसाय, शेतीत किंवा हंगामी कामगार म्हणून कार्यरत आहे. घरातील व्यवसायात मदत केल्यामुळे त्यांना वेगळे वेतन मिळत नाही, इतर कोणतेही लाभ मिळत नाही, ही वस्तुस्थिती तपासण्याची आता आवश्यकता आहे. त्यामुळे भारत सरकारच्या बाल आणि महिला मंत्रालयामध्ये पतीच्या डेथ सर्टीफिकेटवर त्याच्या विधवा पत्नीचे नाव लावावे यासाठी प्रयत्नशील आहे. तसेच महिला उत्पादकांना बाजारपेठ मिळावी यासाठी महिला ई-हाट ही ऑनलाइन बाजारपेठ सुविधा सोळा उत्पादनांसाठी असून महिलांनी ऑनलाइन नोंदणी केल्यास त्यांना हा लाभ घेता येतो.

जग तांत्रिकदृष्ट्या झपाट्याने बदलत असताना महिलांना या प्रवाहात आणण्यासाठीचे अनेक प्रयत्न जागतिक, राष्ट्रीय स्तरावर होत आहेत. डिजिटल डिव्हाईडच्या अंतर्गत महिलांचा विचार प्रामुख्याने होत आहे. डिजिटल उद्योगामध्ये सोशल नेटवर्किंग, ऑनलाइन मार्केटिंग, ग्राफिक, वेब, कंटेट मॅनेटमेंट, मोबाइल ॲप्लिकेशन अशा नवीन व्यवसायांची भर पडत आहे. या क्षेत्रातील महिंलांचे प्रमाण आजच्या घडीला केवळ १८ टक्के आहे. त्यामुळे फेसबुकवर होणाऱ्या महिलाविरोधी मते, खच्चीकरण करणारे प्रयत्न हे ऑनलाइन हिंसा या नवीन प्रकारात विचारात घेतले जात आहे. अलीकडेच प्रसिध्द टीव्ही अँकर बरखा दत्त यांनी आपल्यावर फेसबुक आणि ट्विटरवर होणाऱ्या दर्जाहीन आणि विचारी टीकेवर जाहीरपणे नाराजी व्यक्त केली आहे. थोडक्यात, देशाच्या राष्ट्रीय उभारणीत, विकासात महिलांचा सहभाग वाढवायचा असेल तर त्यांना सर्वच क्षेत्रे खुली करणे, सामाजिक धोरणे आणि सुरक्षितता आणणे, कायदे, नियम तयार करणे, सर्व प्रकारच्या हिंसांना प्रतिबंध करणे यांसारख्या उपाययोजना केल्यास संयुक्त राष्ट्रसंघाच्या २०३० पर्यंतच्या विकासांच्या १७ उद्दिष्टांपैकी महिलांच्या संदर्भातील उद्दिष्टपूर्ती विशेषतः स्त्री-पुरुष समानता आणि सर्वसमावेशक धोरणात महिलांचा सहभाग यावर भर देता येईल. २०३० पर्यंत हे बदलते जग महिलांसाठी असेल असा केवळ आशावाद न करता त्या दिशेने भारतात अधिक जोमाने प्रयत्न होणे आवश्यक आहे.

● डॉ. निशा मुडे-पवार
nishapawar1968@rediffmail.com